**<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक १५९/२०१० मधील निशाणी १४२ खालील आदेश</u>**

१. वादी क्रमांक ४ ने प्रस्तूतचा अर्ज आदेश २२ नियम ३ (१) दिवाणी प्रक्रिया संहिताच्या तरतुदी अन्वये सर्व प्रतिवादीच्या विरोधात दाखल केले आहे. वादी क्रमांक ४ ने मागणी केली आहे की मयत वादी क्रमांक ३ चे कायदेशिर वारसदार रेकॉर्डला घेण्याची परवानगी वादी क्रमांक ४ ला देण्यात यावी.

२. प्रस्तूतच्या अर्जाची थोडक्यात वस्तूस्थिती अशा प्रकारे आहे की, वादी क्रमांक ४ कथन करतात की, वादी क्रमांक ३ शकिल पीर मोहम्मद कुरेशी हे तारीख १९.०२.२०१७ रोजी मरण पावले आहे आणि त्यांच्या मृत्यु पश्चात मयत वादी क्रमांक ३ चे कायदेशिर वारसदार अनुक्रमे ३-अ ते ३-ह आहेत आणि म्हणून प्रस्तूतचा दावा सर्व प्रतिवादीच्या विरोधात चालविण्याचा हक्क मयत वादी क्रमांक ३ च्या पश्चात पक्षकार कायदेशिर वारसदारांना आहे. वादी क्रमांक ४ कथन करतात की वादी क्रमांक ३ चे तारीख १९.०२.२०१७ रोजी मरण पावले आहे आणि म्हणून प्रस्तूतचा अर्ज मुदतीच्या कालावधीत आहे. वादी क्रमांक ४ ने मागणी केली आहे की मयत वादी क्रमांक ३ चे अनुक्रमे कायदेशिर वारसदार अनुक्रमे ३-अ ते ३-ह ला रेकॉर्डवर आणण्याची परवानगी वादी क्रमांक ४ ला देण्यात यावी. वादी क्रमांक ४ ने विनंती केली आहे की विनंती केली आहे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. म्हणून प्रस्तूतचा अर्ज.

३. प्रस्तूतच्या अर्जाच्या वस्तूस्थितीचे अवलोकन केले. वादी क्रमांक ४ व सर्व प्रतिवादींच्या विद्वान वकिलांना ऐकले. सर्व प्रतिवादीने मयत वादी क्रमांक ३ च्या पश्चात कायदेशिर वारसदारांना दप्तरी सदरी आणण्यास ना-हकरत घेतली आहे.

४. वादी क्रमांक ४ च्या विद्वान वकीलांने युक्तीवादामध्ये भर दिलेले दस्त एवेजी पुरावा मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की तारीख १९.०२.२०१७ रोजी वादी क्रमांक ३ हे मरण पावले आहे. वादी क्रमांक ४ ने युक्तीवादामध्ये भर दिलेले दस्त ऐवजी पुरावा मृत्युचे प्रमाणपत्राच्या आधारे हे स्पष्ट होते की वादी क्रमांक ३ जे मरण पावले आहे आणि त्यांच्या मृत्युपश्चात नियोजित पक्षकार मयत

वादी क्रमांक ३ चे कायदेशिर वारसदार ३-अ ते ३-ह यांची नांवे रेकॉर्डवर आणण्यास वादी क्रमांक ४ पात्र बनतात. आणि म्हणून असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही की वादी क्रमांक ४ च्या विद्वान वकीलांने दप्तरी सदरी अआव्हानात्मकरित्या सिध्द केले आहे की नियोजीत पक्षकार कायदेशिर वारसदार ३-अ ते ३-ह यांची नांव मयत वादी क्रमांक ३ चे वारसदार म्हणून दप्तरी सदरी आणण्यास वादी क्रमांक ४ पात्र बनतात. मी हया निष्कर्षास पोहचली आहे की प्रस्तूतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब उत्तरास मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर.

२. वादी क्रमांक ४ ला मयत वादी क्रमांक ३ चे कायदेशिर वारसदारांची नांव रेकॉर्ड वर घेण्याची परवानगी देण्यात आली आहे.

३. खर्चा संबंधी आदेश नाही.

स्वाक्षरीत/-
( वै.म. गोतसुर्वे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वैजापूर.

दिनांक : ०७-१२-२०१७

## CERTIFICATE

I am affirm that the contents of this P.D.F., file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Yogesh H. Gajbhiye |
| Court | :- | Jt. Civil Judge (S.D.) Vaijapur. |
| Date | :- | 07.12.2017 |
| Order signed by the presiding officer on | :- | 07.12.2017 |
| Order uploaded on | :- | 18.01.2018 |